# गोवा कर्मचारी निवड आयोग

6वा मजला, 3री लिफ्ट, **स्पेसेस** इमारत, पाटो प्लाझा, पणजी – गोवा – 403001
संकेतस्थळ: gssc.goa.gov.in

---

प्रश्नपत्रिका (सीबीटी) बाबत  तक्रार करण्यासाठी उमेदवारांना सुधारित सूचनाः

1) उमेदवाराच्या खात्यात सीबीटी प्रश्नपत्रिका उपलब्ध असेल. उमेदवारांना विनंती आहे की त्यांनी गोवा कर्मचारी निवड आयोगाच्या gssc.goa.gov.in. या संकेतस्थळावर उमेदवार कॉर्नरच्या 'माझी प्रश्नपत्रिका'या टॅबवर क्लिक करून दिलेल्या की वरून स्वतःची प्रश्नपत्रिका तपासावी.

2) कोणतीही तक्रार असल्यास, उमेदवार प्रति प्रश्न रु. 100/– शुल्क भरून ती नोंदवू शकतात.

3) उमेदवाराने त्याच्या/तिच्या तक्रारीची प्रत, आयोगाच्या संकेतस्थळावर प्रश्नपत्रिका अपलोड झाल्याच्या तारखेनंतर तीन कामकाजीय दिवसांच्या आत खाली दिलेल्या नमुन्यात, कोणत्याही राष्ट्रीयीकृत/शेड्युल्ड बँकेतून "गोवा कर्मचारी निवड आयोग" च्या नावे काढलेल्या, पणजी–गोवा येथे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टसह (प्रत्येक तक्रारीसाठी स्वतंत्र), गोवा कर्मचारी निवड आयोगाच्या, 6वा मजला, 3री लिफ्ट, **स्पेसेस** इमारत, पाटो प्लाझा, पणजी – गोवा येथील कार्यालयात सादर करावी.

पर्यायाने, आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध क्यूआर कोड स्कॅन करून उमेदवार ऑनलाईन शुल्क भरू शकतात. यूपीआय ट्रान्झॅक्शन आयडी तक्रार अर्जावर नमूद केला जाईल.

4) उमेदवाराने त्याच्या/तिच्या प्रश्नपत्रिके सोबत तक्रार निवारण अर्जही सादर करावा. अनेक तक्रारींसाठी, स्वतंत्र प्रश्नपत्रिका सादर करण्याची आवश्यकता नाही

5) उपरोक्त कालावधीनंतर आयोग कोणत्याही  तक्रारींची दखल घेणार नाही.

6) वरीलप्रमाणे आयोगाला प्राप्त झालेल्या तक्रारींचे परीक्षण केले जाईल.

7) तक्रार निवारणानंतर गुणवाटप :-

a) दिलेल्या पर्यायांपैकी कोणताही पर्याय निवडला नाही किंवा प्रश्न सोडवला नाही अशा उमेदवाराला कोणताही गुण दिला जाणार नाही.

b) आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या एखाद्या प्रश्नाची उत्तर विवरणी चुकीची आढळल्यास:

(i) ज्या उमेदवाराने योग्य पर्याय निवडला आहे त्याला एक गुण देण्यात येईल.

(ii) ज्या उमेदवाराने अचूक उत्तराशिवाय दुसरा पर्याय निवडला आहे त्याला कोणताही गुण दिला जाणार नाही.

(iii) उमेदवाराने जर दर्शविलेल्या उत्तर विवरणी प्रमाणे पर्याय निवडला होता, जी चुकीची आढळली होती, तर एक गुण कापला जाईल.

c) प्रश्न जर

(i) चुकीचा असल्यास

(ii) चुकीच्या शब्दात असल्यास

(iii) डेटा दिलेला नसल्यास.

(iv) डेटा अपुरा असल्यास.

तेव्हा “(ई) वरीलपैकी कोणताही नाही” हा पर्याय उमेदवार निवडू शकतो आणि अशा प्रकरणांमध्ये तज्ज्ञांच्या मतानंतर हा पर्याय निवडणाऱ्यांना एक गुण दिला जाईल.

d) तक्रार प्राप्त झाल्यानंतर, तज्ज्ञांना एका प्रश्नाचे दोन पर्याय, योग्य उत्तरे म्हणून आढळल्यास, ज्या उमेदवारांनी दोन्हींपैकी एक पर्याय निवडला आहे, त्यांना एक गुण देण्यात येईल.

**संकेतस्थळावर अपलोड केलेल्या प्रश्नपत्रिकेसंदर्भात (सीबीटी) उमेदवाराची तक्रार**

जाहिरात क्र. पदाचे नाव:

सीबीटीची तारीख: प्रश्न क्र:

| प्रश्न | उमेदवारांनी सूचविलेले उत्तर | संदर्भ साहित्य (संलग्न करावयाची प्रत) | शेरा, जर असल्यास. |
|---|---|---|---|
| (a)<br>(b)<br>(c)<br>(d)<br>(e) | | पुस्तकाचे नाव:<br>लेखकाचे नाव:<br>पृष्ठ क्र:<br>प्रकाशकाचे नाव व पत्ता:<br>प्रकाशन वर्ष: | |

यूपीआय ट्रान्झॅक्शन आयडी: ________________________

टीप:

1. प्रत्येक प्रश्नासाठी, वर दिलेल्या नमुन्यात, स्वतंत्र पानावर अर्ज करावा, ज्यामध्ये अर्जात प्रश्न क्रमांकाचा न चुकता उल्लेख करावा.
2. तर्क किंवा गणिती प्रश्नांशी संबंधित तक्रार असल्यास, उमेदवाराला, जे त्याला/तिला योग्य उत्तर वाटते ते उत्तर अर्जासोबत सविस्तर देणे आवश्यक आहे.
3 उपरोक्त सूचनांमध्ये नमूद केलेल्या कालमर्यादेत सर्व तक्रारी स्वीकारल्या जातात.

अर्ज आयडी:________________ अर्जाची तारीख:_____________

उमेदवाराची सही: _______________________________________________________

उमेदवाराचे नाव:________________________________________________________